**प्रेस नोट** **दि.०६/०४/२०१९**

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## मोटर सायकली चोरणाऱ्या चोरटयास खडक पोलीस स्टेशन कडुन जेरबंद

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी असे खडक पोलीस स्टेशन चे हद्दीत पेट्रोलींग फिरत असतांना पोकॉ राकेश क्षिरसागर यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, दोन दिवसांपुर्वी दलाल चौकातून दुपारचे वेळेस एक मोटर सायकल चोरणारा चोरटा हिराबाग एस.आर.ए.बिल्डींगजवळ येणार आहे, त्याप्रमाणे मा.श्री.राजेन्द्र मोकशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली एस.आर.ए. बिल्डींग, सुभाषनगर येथे साधे वेशात सापळा रचला असता एक इसम टिळक रोडचे दिशेने एस.आर.ए.बिल्डींगचे जवळ त्याचेकडील पॅशन मोटर सायकलवर येवून थांबलेला, त्याचे हालचाली संशयास्पद दिसुन आल्याने त्यास स्टाफचे मदतीने अचानक झडप घालुन पकडले त्याला त्याचा नाव, पत्ता विचारता त्याने आपले नाव पत्ता **सागर शंकर घोडके वय १८ पुर्ण वर्ष,रा.वाडेकर वस्ती, भारत फोर्स पाठीमागे, मुंढवा, पुणे** असे असल्याचे सांगीतले. त्याचे ताब्यात असलेल्या ४०,०००/- रु किं ची हिरो होन्डा कंपनीची पॅशन प्लस एम एच.१२.ई.एल.३४९३ याबाबत त्याचेकडे विचारपुस करता प्रथम तो उडवा उडवी उत्तरे देवु लागल्याने त्यास खडक पोलीस स्टेशन येथे आणुन अधिक तपास करता त्याने सदरची गाडी ही दोन दिवसांपुर्वी दलाल चौक, गुरुवार पेठेतुन चोरली असल्याचे कबुली दिल्यी. त्याबाबत गाडी बाबत **खडक पोलीस स्टेशनला गुन्हा रजि नं १८४/२०१९ भा.दं.वि कलम ३७९** प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

वरील आरोपीकडे अधिक कसुन तपास करता त्याने व त्याचा अल्पवयीन साथीदार याचे मदतीने मुंढवा भागातुन आणखी दोन हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटर सायकली चोरल्या असल्याचे सांगुन त्या गाडयाचा वापर करुन त्या गाडया राहते घराचे जवळ पार्कींग मध्ये हॅण्डेल लॉक् करुन ठेवल्या असल्याचे सांगितल्याने, त्याप्रमाणे अटक आरोपीचे मदतीने मुंढवा येथे जावुन (१) ३०,०००/- रु किं ची एक हिरो होंन्डा स्प्लेंडर एम एच १२ एफ व्ही ५५९२ (२) ३५,०००/- रु किं ची एक हिरो होंन्डा स्प्लेंडर एम एच १३ क्यु ८०७७ अशा दोन मोटर सायकली जप्त करण्यात आल्या आहेत, त्या बाबत मुंढवा पोलीस स्टेशनकडे खात्री करता अ.क्र १ मोटर सायकल बाबत **मुंढवा पो स्टे गुन्हा रजि नं ९९/२०१९ भा.दं.वि क ३७९** व अ.क्र २ मोटर सायकल बाबत **मुंढवा पो स्टे गुन्हा रजि नं १००/२०१९ भा.दं.वि क ३७९** प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले असुन वरील आरोपीकडुन **१,०५,०००/- रु किं च्या एकुण ३ मोटर सायकली हस्तगत** करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे अल्पवयीन मुलास ताब्यात घेण्यात आले आहे.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, संदिप पाटील, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, महावीर दावणे, इम्रान नदाफ, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.

(उत्तम चक्रे)
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
खडक पोलीस स्टेशन पुणे